**विषय:- मा.स्थायी समिती व महापालिका सभा यांचे मान्यतेकामी मा.आयुक्त यांचेकडे विषयपत्र सादर करताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत...**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**लेखा विभाग**
**क्र./लेखा/कावि/१३४९/२०२२, दि.३०/१२/२०२२**

**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांमार्फत मा.आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांचेमार्फत मा.स्थायी समिती व महापालिका सभा मान्यतेसाठी विषयपत्र सादर केले जातात. सदरचे विषयपत्र विशेषत: विकासकामे, वस्तु व सेवा खरेदी व आर्थिक बाबींशी निगडित असतात. वास्तविक असे विषयपत्र सादर करताना ते मुख्य लेखा व वित्त अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांचे अभिप्राय न घेता माझ्याकडे सादर करित असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सर्व सबधितांनी मा.आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांच्याकडे प्रस्ताव सादर करताना खालील कार्यपद्धतीचा अवलंब करणेत यावा.

- निविदा विषयक सर्व प्रकारचे विषयपत्र हे मुख्य लेखा परिक्षक यांचे अभिप्राय घेऊन मा.आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांचेमार्फत सक्षम मान्यतेकामी सादर करावेत.

- आर्थिक बाबीशी निगडित असणारे प्रस्ताव मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे अभिप्राय घेऊन मा.आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांचेमार्फत सक्षम मान्यतेकामी सादर करावेत. उदा.निविदा कामकाजास मुदतवाढ, अंदाजपत्रकातील तरतूद वर्गीकरण व एखादया निर्णयामुळे होणारे आर्थिक दायित्व.

वरील विषयाशी संबंधित मा.आयुक्त यांचेकडे सादर करणेत येणारी विषयपत्रे हे मुख्य लेखा व वित्त अधिकारी/मुख्य लेखा परिक्षक यांचे अभिप्राय घेऊन सादर करावेत. त्यांचे अभिप्राय न घेता काही त्रुटी अथवा कायदेशीर बाबी उद्भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी विभागप्रमुखावर राहील याची नोंद घ्यावी.

(शेखर सिंह)
**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी**

**प्रत:- सर्व संबंधित विभागप्रमुख**